# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक)
## ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांच्या दि. २५.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार, बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाईन पद्धतीने रविवार, दि. १८.१०.२०२० ते गुरुवार, दि. २२.१०.२०२० या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. ऑनलाईन पद्धतीने सभेचे कामकाज झाले असल्याने बँकेचे मुख्य कार्यालय ‘कल्याणमस्तु’, ओम विजयकृष्ण अपार्टमेंट, आधारवाडी, कल्याण (प) हे सभास्थान गृहीत धरण्यात आले. रविवार, दि. १८.१०.२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

सकाळी ठीक १०.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नाही, सबब सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे ठीक १०.३० वाजता आहे त्याच लिंकवर सुरु होईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर सकाळी ठीक १०.३० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली.

सभेच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व दुखवटयाचा ठराव मांडण्याची विनंती बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना केली.

यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांच्या नावांचे वाचन केले.

त्यानंतर बँकेचे मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सूचित केले व सर्वांना अर्धा मिनिट शांतता पाळण्याची विनंती केली.

**ठराव क्र. १ : दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना ही सभा श्रद्धांजली वाहत आहे.

माजी राष्ट्रपती भारतरत्न - प्रणव मुखर्जी, केंद्रीय मंत्री - श्री. रामविलास पासवान, बँकेचे माजी संचालक अध्यक्ष - अरुण कदम, कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे माजी महापौर - राजेंद्र देवळेकर, माजी संरक्षण मंत्री - जसवंत सिंग, मध्यप्रदेश माजी मुख्यमंत्री - कैलास जोशी, माजी जलसंधारण मंत्री - बाबासाहेब धाबेकर, माजी मुख्य निवडणूक आयुक्त - टी. एन्. शेषन्, महाराष्ट्राच्या माजी मुख्य निवडणूक अधिकारी - नीला सत्यनारायण, माजी आमदार - सीतलदास हरचंदानी, अभिनेते - विजू खोटे, ज्येष्ठ रंगकर्मी - अरुण काकडे, ज्येष्ठ लेखिका - गिरीजा कीर, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक - डॉ. आनंदप्रकाश दीक्षित, माजी पोलिस महासंचालक - अरविंद इनामदार, ज्येष्ठ विज्ञान लेखक - मोहन आपटे, ज्येष्ठ अभिनेते - डॉ. श्रीराम लागू, ज्येष्ठ व्यंगचित्रकार -विकास सबनीस, अभिनेते - जयराम कुलकर्णी, अभिनेते - इरफान खान, सामाजिक कार्यकर्त्या - अपर्णा रामतीर्थकर, अभिनेता - ऋषी कपूर, लेखक, साहित्यिक - रत्नाकर मतकरी, सुप्रसिद्ध दिग्दर्शक - बासु चॅटर्जी, अभिनेता - सुशांतसिंग राजपूत, नृत्य दिग्दर्शिका - सरोज खान, चित्रपट दिग्दर्शक - निशिकांत कामत, मेवाती घराण्याचे ज्येष्ठ शास्त्रीय गायक - पंडित जसराज, ज्येष्ठ अभिनेत्री व गायिका - आशालता वाबगावकर, सुप्रसिद्ध पार्श्वगायक - एस्. पी. बालसुब्रमण्यम्, ज्येष्ठ समिक्षिका - पुष्पा भावे, बँकेला वेळोवेळी कायदे विषयक मार्गदर्शन करणारे, हितचिंतक ज्येष्ठ वकील श्री. झुबेर नजमुद्दीन काझी उर्फ पापा काझी.

# <u>दिवंगत सभासदांची यादी</u>

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ५०४७५ | जामसांडेकर विनोद शंकरराव | १४.०१.२०१९ |
| २ | १०६०७ | कांबळे मोतीलाल महादेव | २२.०१.२०१९ |
| ३ | १०१३२ | भुतडा गीता वसंत | २३.०१.२०१९ |
| ४ | ४२९६२ | बजाज कमला रामविलास | ०२.०२.२०१९ |
| ५ | ४२७१७ | बिरवाडकर सरस्वती शांताराम | १५.०३.२०१९ |
| ६ | २०७३३ | भट गंगाधर यशवंत | २१.०३.२०१९ |
| ७ | १२६७० | मेघश्याम प्रमोद रामकृष्ण | २७.०३.२०१९ |
| ८ | ५१५८७ | टोले जयवंत रामचंद्र | ०४.१०.२०१९ |
| ९ | ३८३८५ | जाधव अंकुश बापूराव | ०४.११.२०१९ |
| १० | ३६७२७ | के. उन्नीनारायणन् | २१.०४.२०१९ |
| ११ | ५६१०५ | मेहता तेजल हसित | २२.०४.२०१९ |
| १२ | ४५२६२ | गोखले मंगला सुरेश | ०५.०९.२०१९ |
| १३ | ३२३८० | कुलकर्णी नितीन विनायक | १४.०५.२०१९ |
| १४ | २०७१९ | देवळालकर कुसूम शंकर | १५.०५.२०१९ |
| १५ | ३९००१ | कडु विजय पुंडलिक | ०६.०२.२०१९ |
| १६ | २८६३८ | परमार आत्माराम हमीरभाई | ०६.०८.२०१९ |
| १७ | ४४२३ | बाऊस्कर वसंत चिंधू | १८.०६.२०१९ |
| १८ | ६१८२२ | जाधव संतोष रामचंद्र | २६.०६.२०१९ |
| १९ | १५३१९ | मोरे आत्माराम महारु | ०७.०९.२०१९ |
| २० | ३४४१४ | गडगे अनिल लक्ष्मण | ०७.०९.२०१९ |
| २१ | २५०९२ | खेडकर प्रदिप मधुकर | ०७.१०.२०१९ |
| २२ | २४८९१ | भालेराव संजय बबन | २०.०७.२०१९ |
| २३ | २८७० | जायस्वाल श्यामनारायण बाबुलाल | २१.०७.२०१९ |
| २४ | १५७९२ | मोहबे नरेशकुमार ब्रिजलाल | ०१.०८.२०१९ |
| २५ | १०८४८ | पुजारी रमेश भिमाप्पा | ०८.०८.२०१९ |
| २६ | ३६७९७ | शैख मंझूर अहमद | ०८.०९.२०१९ |
| २७ | १४२२९ | राठोड करसन कानजी | १७.०८.२०१९ |
| २८ | ६८८८१ | रानडे संध्या गोपाळ | १७.०८.२०१९ |
| २९ | २१३७६ | गायकवाड रघुनाथ हिरामण | २०.०८.२०१९ |
| ३० | २७०१ | जाधव नारायण गणपत | २१.०८.२०१९ |
| ३१ | ३९९० | बजाज सुभाष चुन्नीलाल | २२.०८.२०१९ |
| ३२ | २७३४४ | निरभवणे सिंधु भास्कर | २५.०८.२०१९ |
| ३३ | २७२२८ | मतकर महेश प्रभाकर | २८.०८.२०१९ |
| ३४ | १०७९० | सावंत तुकाराम काका | ३१.०८.२०१९ |
| ३५ | २४९६३ | प्रधान विनोदिनी भालचंद्र | ०९.१०.२०१९ |
| ३६ | २०४३० | जोशी आशा अशोक | १६.०९.२०१९ |
| ३७ | ३६७६१ | पष्टे उत्तकर्शा उमेश | १८.०९.२०१९ |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ३८ | १९४४१ | बोडस रमाकांत यशवंत | २१.०९.२०१९ |
| ३९ | २०२०९ | मोरे सिद्धार्थ बारसु | २६.०९.२०१९ |
| ४० | २१९४० | चिंगळे शामसुंदर महादेव | २९.०९.२०१९ |
| ४१ | ४९८३४ | आरोटे प्रकाश गुलाब | ०३.१०.२०१९ |
| ४२ | ४८०७० | सोनवणे कैलास भिवसन | १०.०८.२०१९ |
| ४३ | ७७६ | खान अब्दुलगनी दादा मिया | १०.०८.२०१९ |
| ४४ | ६५४१७ | अग्रवाल मोहन विश्वनाथ | १०.०९.२०१९ |
| ४५ | ५६०९५ | उगले अशोक माधव | १०.०९.२०१९ |
| ४६ | १८२८२ | कुलकर्णी मोरेश्वर गोविंद | १०.१०.२०१९ |
| ४७ | ५८२७६ | पाटील कमलाकर शनिवार | १०.११.२०१९ |
| ४८ | १००९१ | बुटाला अजित गोपीनाथ | १०.१२.२०१९ |
| ४९ | २३१०७ | ओनावळे दिवाकर रामसिंग | १७.१०.२०१९ |
| ५० | ५७९२ | भोईर चंद्रकांत शनिवार | २०.१०.२०१९ |
| ५१ | ५०४५ | बागराव सुभाष पांडुरंग | २२.१०.२०१९ |
| ५२ | ४९०५९ | जोशी सदाशिव गंगाधर | २४.१०.२०१९ |
| ५३ | १९७६२ | ताम्हणकर भास्कर दामोदर | २५.१०.२०१९ |
| ५४ | ३८७५७ | राय शिवराम विठ्ठल | २६.१०.२०१९ |
| ५५ | ३७५३० | देशमुख जगन्नाथ तुकाराम | २९.१०.२०१९ |
| ५६ | १०७४४ | नागे शांताराम नारायण | ३१.१०.२०१९ |
| ५७ | ५२०४२ | मुळे उमा रमेश | ११.११.२०१९ |
| ५८ | ५३७३५ | सितापरा हेमंत पुंजा | १६.११.२०१९ |
| ५९ | ४४५५० | हारदास मोहन पांडुरंग | १६.११.२०१९ |
| ६० | ४५११७ | ठक्कर दिनेश धिरजलाल | १७.११.२०१९ |
| ६१ | १३३१९ | घेंगडे रमेश केशरा | २२.११.२०१९ |
| ६२ | २५७९६ | रॉडरिग्ज् जॉन पीटर | २४.११.२०१९ |
| ६३ | २३५६१ | शैख बाबाजान मोहम्मद | १२.०६.२०१९ |
| ६४ | ३७३३७ | कोल्हे रघुनाथ दिगंबर | १२.०७.२०१९ |
| ६५ | ६८८५८ | उबाळे शांताराम चिंधु | २६.१२.२०१९ |
| ६६ | ४७५०५ | दशपुते सुशिला काशीनाथ | ३१.१२.२०१९ |
| ६७ | ५५३७६ | भगत अमृतलाल हरीकिसनदास | १८.०१.२०२० |
| ६८ | ३७४१० | फड वसंत कचरु | २२.०१.२०२० |
| ६९ | ५३४९३ | यादव रामआसरे बलीकरन | २३.०१.२०२० |
| ७० | ५००२१ | तेली लक्ष्मण भिकाजी | २४.०१.२०२० |
| ७१ | २१७७५ | रामगुडे दयानंद ज्ञानदेव | २६.०१.२०२० |
| ७२ | १५९०४ | देवळालकर शंकर गोविंद | २९.०१.२०२० |
| ७३ | ५३०३ | डोंगरे दत्तात्रय नामदेव | ०२.०२.२०२० |
| ७४ | ४१६८३ | करेलिया अमृतलाल मोहनलाल | ३१.०७.२०१९ |
| ७५ | ६१००६ | जोशी अनिल वसंत | १७.०२.२०२० |
| ७६ | ५१०९ | पाटील चंदु मारुती | २६.०२.२०२० |
| ७७ | ५८१४३ | चौधरी सुरेंद्र शांतीस्वरुप | ०३.०१.२०२० |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ७८ | १५०५० | वाघ निलेश प्रकाश | ०३.०१.२०२० |
| ७९ | ६०२३४ | मोकळ मोतीराम रभाजी | १७.०३.२०२० |
| ८० | ५२४०६ | अहुजा करतारकौर तिरथराम | २६.०४.२०२० |
| ८१ | २०७४२ | अय्यर ए. शिवरामक्रिशन्न | १७.०५.२०२० |
| ८२ | ३७२८१ | पैलकर सुमती अरुण | २३.०५.२०२० |
| ८३ | ९९७ | भावसार दशरथ काळुराम | १४.०६.२०२० |
| ८४ | ४६१३१ | जाजु तारामती बाळकृष्ण | १७.०६.२०२० |
| ८५ | १८८७३ | घोसाळकर सुरेश शामराव | १८.०६.२०२० |
| ८६ | ४२८४९ | खंडेलवाल भवानी शंकर | १९.०६.२०२० |
| ८७ | ३२९१९ | कोंडके नेहा संदेश | २५.०६.२०२० |
| ८८ | १६४१३ | सचदेव चंद्रेश हरसुखलाल | २५.०६.२०२० |
| ८९ | २२८३० | गोळे जयश्री पुरुषोत्तम | २७.०६.२०२० |
| ९० | ३२०४४ | कुलकर्णी प्रकाश प्रभाकर | ०७.०३.२०२० |
| ९१ | ३६७७० | मामेडवार औदुंबर नारायण | ०७.०५.२०२० |
| ९२ | २३५३७ | भालेराव सुरेश दगडु | ०७.०७.२०२० |
| ९३ | ४७१३७ | देसाई पांडुरंग धोंडू | १८.०७.२०२० |
| ९४ | १६८८६ | शिरवाडकर साधना हेमंत | २५.०७.२०२० |
| ९५ | २७६५१ | नरबीर दरबार सिंह | ०८.०२.२०२० |
| ९६ | ४२०६५ | सावंत सुनील अनंत | ०८.०३.२०२० |
| ९७ | ४८१०९ | देशपांडे विजया बाळकृष्ण | ०९.०१.२०२० |
| ९८ | २७७६३ | सरोदे मोहन विठ्ठल | १०.०१.२०२० |
| ९९ | ३२६५० | पाटील प्रेमचंद पुरुषोत्तम | ११.०७.२०२० |
| १०० | ५८२३८ | जोशी मनोज मधुसूदन | १२.०५.२०२० |
| १०१ | २०२०७ | पाटील विजय शंकर | १२.०५.२०२० |
| १०२ | ३३१७२ | रणबागले तुकाराम बाबुराव | १३.०६.२०२० |
| १०३ | ३६०७१ | मोकल नितीन भिमाजी | १८.०७.२०२० |
| १०४ | १५७५० | धनवटे रामचंद्र आनंदराव | १५.०५.२०२० |
| १०५ | ३९९६७ | पुजारी अरुण गुड्डे | १५.०६.२०१९ |
| १०६ | २४२१९ | पाटील मधुकर बाबु | १८.०३.२०१९ |
| १०७ | १८१५४ | साळवे भिमराव सहादू | ०२.०९.२०१९ |
| १०८ | २८३१० | मराठे दिलीप सिताराम | ०१.०८.२०१९ |
| १०९ | ४१७९२ | गोवर्धने कमलाबाई वालचंद्र | २०.०१.२०२० |
| ११० | ३५३३६ | मोरे पांडुरंग दयाराम | ११.०६.२०१९ |
| १११ | १०८९२ | जोशी अरविंद उमाकांत | १६.०६.२०२० |
| ११२ | ६८९७२ | ठक्कर अनिलकुमार विठ्ठलदास | २०.०७.२०२० |
| ११३ | २८२५ | प्रसादे मनोहर शांताराम | ११.०१.२०२० |
| ११४ | ६०३५८ | बांदेकर सूर्यकांत काशीनाथ | २८.०६.२०२० |
| ११५ | १८४६५ | आडके शशिकांत हरिश्चंद्र | २१.०७.२०२० |
| ११६ | २६३१२ | म्हात्रे कर्णिक सिताराम | २०.०६.२०२० |
| ११७ | ४२७१६ | बिरवाडकर शांताराम नावजी | २२.०५.२०२० |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ११८ | १३७७३ | पानेरकर जयराम बाबु | २९.०७.२०२० |
| ११९ | ३१८५४ | झाल्टे आंबादास केदु | २५.०७.२०२० |
| १२० | ११०४८ | सकपाळ उदय महादेव | १७.०६.२०२० |
| १२१ | ९६७ | महादेसर गोपीनाथ झिलु | ०१.१०.२०१९ |
| १२२ | ३५०९६ | हरचंदानी सितलदास खुबचंद | ०७.०७.२०२० |
| १२३ | ३८३६ | परदेशी जयनारायण तुलसीरामसिंग | ०२.०४.२०२० |
| १२४ | ४८६८५ | मोरे सुनंदा किसन | १०.०५.२०२० |
| १२५ | ५४९०० | पराते दिलीप केशवराव | २२.०१.२०२० |
| १२६ | ४८१७ | पवार ज्ञानदेव हिरबा | ०७.०७.२०२० |
| १२७ | १५७८४ | सय्यद अकबर मुसा | २६.०७.२०२० |
| १२८ | १९६६८ | अटल कलावती विठ्ठलदास | १७.०७.२०२० |
| १२९ | ८४२६ | यादव विनोदकुमार फुलचंद | २३.०५.२०२० |
| १३० | ३२७१२ | लवानीया धीरज नरेंद्र | २८.१२.२०१९ |
| १३१ | ४४०२५ | विचारे वंदना गजानन | १३.०७.२०२० |
| १३२ | १९०६९ | पारसनिस भगवंत नारायण | ३०.०३.२०२० |
| १३३ | २२४३४ | वाबळे विलास रेवजी | २२.०१.२०२० |
| १३४ | ३५४१३ | मालु जयप्रकाश राधाकिसन | १६.०७.२०२० |
| १३५ | ४६५८६ | सामंत प्रफुल्ल गजानन | १२.०८.२०२० |
| १३६ | ३७०९९ | जोशी वसंत अनंत | १८.०२.२०२० |
| १३७ | २८६३ | पाटील अशोक नाना | २५.०१.२०२० |
| १३८ | ४६२१५ | खडकबाण नीला मनोहर | २२.०७.२०२० |
| १३९ | ५४४९७ | पाटील ललिता सुभाष | २४.०६.२०२० |

मा. अध्यक्षांनी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करतांना कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर या वर्षीची वार्षिक सर्वसाधारण सभा 'Other Audio Visual Means' या पद्धतीने घेण्यात येत आहे, ही माहिती दिली. तसेच, सर्व संचालक या सभेसाठी उपस्थित असल्याचे नमूद केले. बँकेच्या प्रगतीचा अहवाल मांडण्यापूर्वी सभेच्या कामकाजाविषयी माहिती देतांना, मा. अध्यक्षांनी सांगितले की, विषय पत्रिकेतील विषय मांडून झाल्यानंतर, सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार दु. २.०० वाजल्या पासून ते दि. १९.१०.२०२० रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत प्रश्न नोंदणीसाठी लिंक उपलब्ध राहणार आहे. तसेच दि. २१.१०.२०२० व दि. २२.१०.२०२० रोजी मतदानाकरिताची लिंक चालू करण्यात येईल, याची माहिती दिली. तसेच, सभेस उपस्थित सर्व सभासदांना धन्यवाद दिले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

**विषय : संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे. तसेच सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

अहवाल वर्षात भागभांडवलात ₹ १.०५ कोटीने वाढ होऊन बँकेचे भागभांडवल ₹ १११.८९ कोटी इतके झाले आहे. स्वनिधी मध्ये ₹ ८.२६ कोटीने वाढ होऊन वर्षअखेर स्वनिधी ₹ २१०.९१ कोटी आहे. २०१९-२० सालात सभासद संख्येमध्ये २१० सभासदांची वाढ होऊन सभासद संख्या ५६८५८ झाली आहे.

अहवाल वर्षामध्ये बँकेच्या ठेवी ₹ ३०४३ कोटींवरुन ₹ ३१२९ कोटींपर्यंत पोहोचल्या. अहवाल वर्षात कर्जामध्ये घट झाली असून वर्षअखेर बँकेची एकूण कर्जे ₹ १९५८ कोटी इतकी झाली.

बँकेचा निव्वळ नफा सन २०१८-१९ साली ₹ २०.५४ कोटी होता, सन २०१९-२० यावर्षी निव्वळ नफा ₹ १९.०७ कोटी इतका झालेला आहे.

सन २०१८-१९ साली प्रती कर्मचारी उत्पादकता ₹ ९.८४ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन यावर्षी ती ₹ ९.८८ कोटी इतकी झाली आहे.

बँकेने २०१९-२० अखेर भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.५१% इतके राखलेले आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. बँकेने सातत्याने रिझर्व्ह बँकेने घालून दिलेले भांडवल पर्याप्ततेचे निकष पूर्ण केले आहेत.

सन २०१९-२० मध्ये बँकेच्या ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण ५.१९%, तर निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण (Net NPA) २.८३% आहे.

लेखापरीक्षण व तपासणी याबाबत माहिती देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मे. वैशंपायन अँड पाध्ये यांनी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता बँकेस 'अ' वर्ग दिला आहे.

तंत्रज्ञान विभागाबाबत माहिती देतांना मा. अध्यक्षांनी सांगितले की, अहवाल वर्षात बँकेने २३,३७६ डेबिट कार्ड ग्राहकांना दिली असून, आय. एम. पी. एस. सुविधेसाठी १२७१७ व इंटरनेट बँकिंग सुविधेकरीता ५८०१ ग्राहकांनी नोंदणी केली. आपल्या बँकेने तंत्रज्ञानाचा वापर अतिशय चांगल्या प्रकारे केला असून अहवालात नमूद केलेल्या डिजिटल बँकिंग व्यवहारांच्या वाढलेल्या संख्येवरुन हे लक्षात येते.

बँकिंग सेवेव्यतिरिक्त विमा सेवा व फ्रँकिंगची सेवा आपली बँक ग्राहकांना देत आहे.

बँक २०११ पासून कोटक लाईफ इन्शुरन्स कंपनी व २०१४ पासून दि न्यु इंडिया अ‍ॅश्युरन्स कंपनी या विमा कंपनींचे कॉर्पोरेट एजंट म्हणून कार्यरत आहे. जीवन विम्यापोटी ६१० विमा पॉलिसींतून ₹ २०६.०८ लाख रकमेचे विमा हप्ते आणि इतर सर्वसाधारण विम्यापोटी १०९२ पॉलिसींतून ₹ ६०.४२ लाख इतकी विमा प्रिमियम रक्कम बँकेने अहवाल वर्षात जमा केली आहे. या दोन्ही प्रकारच्या विमा व्यवसायातून बँकेने यंदाचे वर्षी ₹ ८०.३९ लाख इतकी रक्कम कमिशनपोटी मिळविली.

त्याचप्रमाणे भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना' व 'प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना' यांचा खातेदारांनी मोठया प्रमाणात लाभ घेतला आहे. प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत ४६०४ खातेदारांनी लाभ घेतला. त्यापोटी ₹ १३.२६ लाख विमा हप्ता रक्कम भरली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा न्यू इंडिया अ‍ॅश्युरन्स कंपनीमार्फत ९८२६ खातेदारांनी लाभ घेतला. त्यापोटी ₹ १.१८ लाख विमा हप्ता रक्कम भरण्यात आली आहे.

अहवाल सालात बँकेने ५४७०९ दस्तऐवज मुद्रांकनाद्वारे ₹ ८.८४ लाख इतके उत्पन्न मिळविले आहे.

**पुरस्कार :** यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याबद्दलची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

१) '**बँको**' मासिकातर्फे आयोजित पुरस्कार सोहळयात मोठया सहकारी बँकांच्या विभागात 'सर्वोत्कृष्ट सहकारी बँक' म्हणून प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

२) '**बँकिंग फ्रंटियर**' या ख्यातनाम मासिकातर्फे बँकेस सन २०१९ चा 'Best Audit Initiative' पुरस्कार प्राप्त झाला.

३) **"कर्नाड बँकिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन"** यांचेतर्फे मोठया सहकारी बँकांच्या गटातून 'Best Bank' हा पुरस्कार बँकेस प्राप्त झाला आहे.

त्यानंतर, अहवाल सालातील ठळक आणि उल्लेखनीय घटनांविषयी मा. अध्यक्षांनी माहिती दिली.

२०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षाकरीताचे संचालक समाजसेवा पुरस्कार दि. २९.१२.२०१९ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल **श्री. भगतसिंह कोश्यारी** यांच्या शुभहस्ते देण्यात आले. व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर **श्री. भास्कर शेट्टी**, बांधकाम क्षेत्रातील **श्री. महेश खैरारी (अगरवाल)**, व उद्योग क्षेत्रातील **श्री. कृष्णलाल धवन** यांना पुरस्कार देण्यात आले. तसेच, विद्यार्थी प्रावीण्य पुरस्कार प्रदान समारंभ दि. २८.०७.२०१९रोजी **सौ. नीता माळी** यांच्या हस्ते संपन्न झाला.

सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून दरवर्षीच्या नफ्यातून १% रक्कम धर्मादाय निधी या फंडामध्ये जमा केली जाते. या वर्षीचा धर्मादाय निधी वितरण समारंभ दि. २१.०२.२०२० रोजी मा. **श्री. सुनिल सप्रे** कार्यवाह, कोकण प्रांत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, यांच्या हस्ते संपन्न झाला. विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या १४० संस्थांना ह्या निधीचे वितरण करण्यात आले.

तसेच, शिक्षक दिन व महिला दिन बँकेच्या विविध शाखांमध्ये दरवर्षी प्रमाणे साजरा करण्यात आला. मा. अध्यक्षांनी या वेळी बदलापूर शाखेचे मोठया जागेमध्ये स्थलांतर झाले असल्याचे सांगितले.

सन २०१९-२० या वर्षाचे व्यवसायाचे अंदाजपत्रक सादर करतांना त्यांनी सांगितले की ठेवी **₹** ३,१५० कोटी व कर्जे **₹** २,००० कोटीपर्यंत जातील, असा अंदाज आहे. त्यामुळे आपला एकत्रित व्यवसाय **₹** ५००० कोटींच्या वर होणे, अपेक्षित आहे.

मा. अध्यक्षांनी पुढे सांगितले की, नागालँडचे राज्यपाल मा. श्री. पद्मनाभ आचार्य यांनी अहवाल वर्षात बँकेस भेट दिली. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेसाठी बँकेने **₹** ५१,००० चा धनादेश त्यांचेकडे सुपूर्त केला. तसेच, उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल मा. श्री. रामभाऊ नाईक यांनी बँकेस भेट देऊन बँकेच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले.

कोरोना साथीचा प्रसार रोखण्यासाठी दि. २४.०३.२०२० पासून देशव्यापी लॉकडाऊन चालू झाला. या काळात अनेक निर्बंध लावले गेले. बँकिंग सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये गणली जात असल्याने आपल्या सर्व शाखा या कालावधीतही अखंडीत सेवा देत होत्या. तसेच, या काळात ग्राहक व सभासद यांनी बँकेस उत्तमरित्या साथ दिल्याने बँकेचे कामकाज सुरळीतपणे चालू राहिले. त्यासाठी मा. अध्यक्षांनी बँकेचे सर्व कर्मचारी, अधिकारी तसेच, सर्व ग्राहक, सभासद व हितचिंतक यांचे आभार मानले व धन्यवाद दिले.

**ठराव क्र. २ :** संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल **मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन** यांनी सभेपुढे वाचून दाखविला. त्याचबरोबर पुढील वर्षाचे अंदाजपत्रक व नवीन व्यावसायिक उद्दिष्टे सभेपुढे मांडली. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. दिलीप दळवी | सभासद क्र. ४२६५१ |
| अनुमोदक : | श्री. हेमंत दरगोडे | सभासद क्र. १६४६१ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

यानंतरचा विषय वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात असून तो मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर यांना सांगितले.

**विषय : वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला दि. ३१.०३.२०२० रोजीचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

विषयास सुरुवात करताना श्री. आंबेकर यांनी सांगितले की ताळेबंद व नफातोटा याबाबतची आकडेवारी मा. अध्यक्षांनी त्यांच्या भाषणांतून सभेपुढे मांडली आहे. FSWM म्हणजेच Financially Sound And Well Managed याकरीता असलेले निकष

पाहता फक्त अग्रक्रम क्षेत्राकरीता दिलेल्या कर्जाचे प्रमाण ह्या निकषाव्यतिरिक्त सर्व निकष म्हणजे CRAR, Net NPA, Gross NPA, Profit इ. आपण पूर्ण केले असून अग्रक्रम क्षेत्राकरीता दिलेल्या कर्जाचे प्रमाण हा निकष आर्थिक वर्ष २०२०-२१ पासून रिझर्व्ह बँकेने FSWM साठी रद्द केलेला आहे. त्यानंतर नफातोटा पत्रकात प्रामुख्याने जे बदल झाले आहेत त्याविषयी बोलतांना मा. श्री. आंबेकर यांनी मागील वर्षामध्ये बँकिंग क्षेत्रात ज्या महत्वाच्या घडामोडी झाल्या, त्याचे मागील वर्षात झालेले परिणाम व पुढे होणारे परिणाम या विषयी थोडक्यात माहिती दिली.

सप्टेंबर २०१९ मध्ये सहकारी क्षेत्रातील एका अग्रगण्य बँकेमधील घोटाळा उघडकीस आला. त्यामुळे सहकार क्षेत्रातील सर्व बँकांकडे लोकांनी संशयाने बघण्यास सुरुवात केली. याचाच परिणाम म्हणून बऱ्याच ठेवीदारांनी आपल्या ठेवी सहकारी बँकांमधून काढून घेऊन राष्ट्रीयकृत बँकांमध्ये कमी दराने ठेवण्यास सुरुवात केली. मात्र, ग्राहकांनी आपल्या बँकेवर दाखविलेल्या विश्वासामुळे त्याचा फार परिणाम आपल्याकडे दिसला नाही. परंतु, या घोटाळयाची रिझर्व्ह बँकेने गंभीर दखल घेऊन बँकांवर काही कडक निर्बंध लावले व काही धोरणे कडकपणे राबविण्यास सुरुवात केली याचाच परिणाम म्हणून अनेक मोठया बँकांना आर्थिक दंड आकारण्यात आले.

याचबरोबर काही चांगल्या गोष्टीही यामध्ये घडल्या. ठेव विमा योजनेअंतर्गत ग्राहकांसाठी विमा मर्यादा रक्कम ₹ १ लाखावरुन ₹ ५ लाख करण्यात आली. तसेच, सहकारी बँकांचे कामकाज अधिक चांगल्या पद्धतीने व्हावे याकरीता रिझर्व्ह बँकेने मागील डिसेंबर महिन्यात Board of Management (BoM) ची संकल्पना आणली त्याबद्दलची माहिती मा. श्री. आंबेकर यांनी सभासदांना दिली. रिझर्व्ह बँकेने प्रति ग्राहक कर्ज मर्यादा व ग्रुप करिता असणारी कर्जमर्यादा याबद्दलच्या निकषांमध्ये बरेच बदल केले आहेत. तसेच अग्रक्रम क्षेत्रासाठीच्या कर्जांबाबतही बरेच बदल केले असून त्याबद्दलची माहिती सभासदांना दिली. त्यानुसार क्रेडीट पॉलिसीमध्ये बरेच बदल करावे लागतील याविषयी माहिती सभासदांना दिली.

जानेवारी २०२० मध्ये भारतात कोविडचा प्रादुर्भाव चालू झाला व दि. २३.०३.२०२० पासून लॉकडाऊन चालू झाले. रिझर्व्ह बँकेने या पार्श्वभूमीवर परिपत्रक काढून मार्च २०२० ते ऑगस्ट २०२० या सहा महिन्यांकरीता कर्जदारांना कर्ज फेडीकरीता मॉरेटोरिअम दिला. तसेच, बँकांना मॉरेटोरिअम दिल्यामुळे जी कर्जखाती मार्च मध्ये NPA झाली नाहीत अशा कर्ज खात्यांकरीता, कर्जरकमेवर, १०% ची तरतूद रिझर्व्ह बँकेने करावयास सांगितली आहे. ज्यापैकी ५% तरतूद मार्च २०२० अखेरीस करावयाची असल्याने बँकेने सदर तरतूद नफा तोटा खाती दाखविल्याचे आपणास दिसेल. उर्वरित तरतूद जून २०२० मध्ये करावयाची आहे.

कोरोना साथीच्या परिस्थितीबाबतची अनिश्चितता, त्याचे सर्व क्षेत्रातील व्यवसायांवर होणारे दुष्परिणाम यामुळे पुढील काही वर्षात अनुत्पादित खर्चात व तसेच इतर खर्चात वाढ होऊ शकते. रिझर्व्ह बँकेने याचा विचार करुन २०१९-२० सालाकरीता लाभांश देण्यास सर्व बँकांना मनाई केली व तसे परिपत्रक सर्व बँकांना दिले.

त्यानंतर BR Act मधील झालेले बदल व त्यामुळे बँकेच्या कामकाज पद्धती, रिझर्व्ह बँकेची नियंत्रणपद्धती या मधील बदल याची थोडक्यात माहिती मा. श्री. आंबेकर यांनी सभासदांना दिली.

वरील बऱ्याच घटनांचा परिणाम मागील आर्थिक वर्षातील व्यवहारांवर कशा पद्धतीने झाला व पुढे कसा होईल ह्या बाबत सविस्तर माहिती मा. श्री. आंबेकर यांनी दिली व आपल्या बँकेची आर्थिक प्रगती समाधानकारक आहे हे सांगितले.

सरासरी कर्जरकमेमध्ये घट झाली असल्याने कर्जावरील व्याज ₹ १५.५६ कोटीने कमी झाले आहे. कर्ज वितरण न झाल्यामुळे ह्या रकमेची गुंतवणूक करण्यात आली असून गुंतवणूकीवरील व्याज ₹ १३.२८ कोटीने वाढलेले दिसत आहे. या वर्षी कर्ज रोखे व्यवहारातून बँकेने मागील वर्षाच्या तुलनेत ₹ ६.२४ कोटी अधिक नफा मिळविला आहे.

ठेवींवरील व्याजात ₹ ६.६२ कोटीने वाढ झालेली दिसत आहे. देय कर्जरक्कम कमी झाल्याने कर्जावरील देय व्याज रक्कम कमी झाल्याचे दिसत आहे. वेतन व इतर भत्त्यांमध्ये फारसा बदल नसून भाडे खर्चात थोडीशी वाढ झालेली आहे. मागील वर्षात मोठया प्रमाणात नवीन खरेदी झाली नसल्याने घसाऱ्यामध्ये घट दिसत आहे. दुरुस्ती व इतर किरकोळ खर्चांमध्ये थोडया फार प्रमाणात वाढ अथवा घट झाली आहे. ऑक्टोबर २०१९ मध्ये सातारा मर्चंट को-ऑप. बँकेच्या विलीनीकरणास १० वर्ष पूर्ण झाली. विलीनीकरण करारातील तरतूदीनुसार

सातारा बँकेकडील येणे रक्कम पूर्णपणे वसुल न झाल्याने सातारा बँकेच्या भागधारकांचे भागभांडवल आपण नफा तोटा खाती वर्ग केले आहे. याबाबतचे लेखापरीक्षण बँकेने करुन घेतले असून रक्कम **₹** १३१.८४ लाख नफा तोटा खाती वर्ग केले आहेत.

अनुत्पादित कर्जांमधील वाढ थोडया प्रमाणात झाली असून सरासरी कर्जे कमी झाल्यामुळे ढोबळ अनुत्पादित कर्जाच्या प्रमाणामध्ये वाढ दिसत आहे. 'नॉन बँकिंग ॲसेटस्' खात्यांमध्ये एका कर्जखात्याची वाढ झाली आहे. मागील वर्षीच्या 'नॉन बँकिंग ॲसेटस्' खात्यांमधील एका खात्यांची मालमत्ता २०१९ मध्ये विकली असून त्या कर्जाबाबतची खर्चासहित पूर्ण वसुली करणे बँकेला शक्य झाले आहे व ह्या वर्षात ARC कडे कोणतेही खाते दिलेले नाही. बँकेने या वर्षी **₹** ५.७६ कोटी रकमेची कर्जखाती, वसुलीबाबतचे सर्व अधिकार अबाधित ठेऊन निर्लेखित केली असून वैधानिक लेखापरीक्षकांनी त्याची तपासणी करुन ती निर्लेखित करण्यास हरकत नसल्याचे / हितकारक असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. आधीच्या निर्लेखित कर्जखात्यांमध्ये सन २०१९-२० या सालात **₹** ९.५६ लाख एवढी वसुली केली आहे.

रिझर्व्ह बँकेने अर्ध वार्षिक पतधोरणामध्ये मार्च २०२१ पर्यंतची महागाई निर्देशांबाबतची अंदाजीत उद्दिष्टये साध्य होतील, असे भाकीत केले आहे. आता हळू हळू सर्व व्यवहार व व्यवसायही पूर्ववत होतांना दिसत आहेत. आश्वासक व आत्मविश्वास वाढविणारा असा आपला ताळेबंद व नफा - तोटा पत्रक आहे.

त्यानंतर मा. श्री. आंबेकर यांनी वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेताना सांगितले की मे. किर्तने अँड पंडित एल. एल. पी. यांनी २०१८-१९ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल दि. २३ मे २०१९ रोजी सादर केला आहे. लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेल्या बाबींचा दोषदुरुस्ती अहवाल बहुराज्यीय कायद्यानुसार वैधानिक लेखापरीक्षकांना दि. १४ ऑगस्ट २०१९ ला सादर करण्यात आला आहे. सदर दोषदुरुस्ती अहवाल त्यांच्याकडून तपासून झाल्यावर दि. ०३.१०.२०१९ रोजी Multistate Co-operative Registrar Delhi यांना पाठविण्यात आला आहे.

मा. श्री आंबेकर पुढे म्हणाले की, लेखापरीक्षण अहवालातील काही मुद्दे उदा. RC Book नसणे, तारण मालमत्तेचा, वाहनांचा विमा नसणे, MIDC परवानगी मिळण्यास विलंब लागल्याने तारण मालमत्तेचे गहाणखत प्रलंबित असणे, अशा काही बाबींची पूर्तता होण्यास ठराविक कालावधी लागत असल्याने असे मुद्दे ऑडिटमध्ये नेहमी येतात व बँक त्यांचा पाठपुरावा करुन पूर्तता करुन घेते. त्यानंतर मा. श्री. आंबेकर यांनी मा. अध्यक्षांना याबाबतचा ठराव मांडण्यास सांगितले.

यानंतर मा. अध्यक्षांनी या विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्र. ३ :** वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांनी दि. ३१.०३.२०२० रोजीचा तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे मांडला व समजावून सांगितला त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे. तसेच मागील वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे सादर केला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. सचिन आंबेकर | सभासद क्र. ३४२८० |
| अनुमोदक : | डॉ. रत्नाकर फाटक | सभासद क्र. १०२९४ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. आघारकर यांना सांगितले.

**विषय : संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१९-२० सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

मा. संचालक श्री. मोहन आघारकर यांनी २०१९-२० सालची नफा वाटणी सभेपुढे विस्तृतपणे मांडली. बँकेने गेली ४६ वर्षे दरवर्षी लाभांश दिला असून अहवाल सालात बँकेस **₹** १९.०७ कोटी नफा झाला असल्याचे नमूद केले. परंतु, या वर्षी रिझर्व्ह बँकेने दि. १७.०४.२०२० रोजीच्या परिपत्रकाद्वारे सर्व बँकांना सन २०१९-२० सालाकरिताचा लाभांश न देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे या वर्षी संचालक मंडळाने लाभांशासाठीची तरतूद केली नाही.

विविध प्रकारच्या निधींसाठी विभागणी कशा स्वरुपात केली आहे याचे विस्तृत विवेचन श्री. आघारकर यांनी केले. सभासद कल्याण निधीचे विश्लेषणही त्यांनी केले. बँकेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी महोत्सव निधीची तरतूद बँक करीत आहे. सभासद व समाजासाठी चांगले उपक्रम राबविण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे असे सांगून त्यासाठी महोत्सव निधीमध्ये या वर्षी ₹ ७१,२०,०००.०० ची तरतूद केल्याचे सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी नफा वाटणी विषयीचा ठराव वाचून दाखविला.

**ठराव क्र. ४ :** सन २०१९-२०२० या वर्षात निव्वळ नफा ₹१९,०७,१५,१६७.०० इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. सदर नफा वाटणीस मंजुरी द्यावी. तसेच धर्मादाय निधीचे वितरण करण्याबाबतचे अधिकार संचालक मंडळास देण्यात यावेत.

(₹)

| | |
|---|---|
| निव्वळ नफा | १९,०७,१५,१६७.०० |
| इमारती निधीतून वर्ग | ६,००,००,०००.०० |
| मागील शिल्लक | ९,२५,६५,५०७.०० |
| **एकूण** | **३४,३२,८०,६७४.००** |
| **वाटणी** | |
| राखीव निधी (२५%) | ४,७७,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी (१०%) | १,९०,७२,०००.०० |
| राष्ट्रीय सहकार शिक्षण निधी (१%) | १९,००,०००.०० |
| गुंतवणूक वध घट निधी | ५०,००,०००.०० |
| लाभांश (२०१८-२०१९) * | ९,२०,३०,९४२.०० |
| धर्मादाय निधी (१%) | १९,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १०,००,०००.०० |
| महोत्सव निधी | ७१,२०,०००.०० |
| कर्मचारी सानुग्रह निधी | ०.०० |
| निवडणूक निधी | ७,००,०००.०० |
| शैक्षणिक निधी | ५,००,०००.०० |
| बुडीत व संशयित कर्ज निधी | १६,६३,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ५७,७३२.०० |
| **एकूण** | **३४,३२,८०,६७४.००** |

* सदर रक्कम ही २०१८-२०१९ करिता दिलेली लाभांश रक्कम आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. मोहन आघारकर | सभासद क्र. ३ |
| अनुमोदक : | प्रा. (डॉ.) वसंत काणे | सभासद क्र. १११ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

त्यानंतर मा. अध्यक्षांनी पुढील विषय मांडण्यासाठी मा. श्री. आंबेकर यांना सांगितले.

**विषय : सन २०२०-२१ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

सन २०२०-२१ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा विषय **मा. संचालक सी. ए. श्री. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे मांडला. मा. श्री. आंबेकर यांनी संचालक मंडळाने प्रस्तावित केलेल्या मे. वैशंपायन अँड पाध्ये या फर्मबाबत थोडक्यात माहिती दिली. या प्रस्तावित नेमणूकीबाबत रिझर्व्ह बँकेस पत्र दिले असून बँकिंग नियामक कायदा, १९४९ मधिल दुरुस्तीनुसार, रिझर्व्ह बँकेने मान्यता / मंजुरी दिल्यानंतरच सदरची नेमणूक होईल हे सभेस सांगितले. भारतीय रिझर्व्ह बँकेने मे. वैशंपायन अँड पाध्ये यांच्या नेमणुकीस मंजुरी दिली नाही तर रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानुसार, पात्र सनदी लेखापाल संस्थेची नेमणूक करण्यात येईल.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी या विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्र. ५** : मल्टीस्टेट सहकारी कायदा २००२ च्या कलम ७० आणि सध्या लागू असलेल्या इतर तरतुदींनुसार सन २०२०-२१ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता, या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे.वैशंपायन अँड पाध्ये यांची नेमणूक करण्यात यावी. परंतु, बँकिंग नियामक कायदा, १९४९ मधील दुरुस्तीनुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार / मंजुरीनुसार, त्यांची नेमणूक राहील. भारतीय रिझर्व्ह बँकेने जर मे. वैशंपायन अँड पाध्ये यांच्या वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूकीस मंजुरी दिली नाही तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानुसार, पात्र सनदी लेखापाल संस्थेची नेमणूक करण्याचे अधिकार ही सभा संचालक मंडळास देत आहे. तसेच, नियमानुसार त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. सचिन आंबेकर | सभासद क्र. ३४२८० |
| अनुमोदक : | श्री. हेमल रवाणी | सभासद क्र. ९०९३ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक यांना सांगितले.

**विषय : उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.**

मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक यांनी अहवालातील पृष्ठ क्र. ८१ ते ८२ वर छापलेल्या सर्व उपविधी दुरुस्त्या वाचून दाखविल्या व त्यांचे सविस्तर विश्लेषण केले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी या विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्र. ६** : बहुराज्यीय सहकारी कायदा, २००२ आणि रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार बँकेच्या कामकाजामध्ये सुसुत्रता यावी यासाठी संचालक मंडळाने उपविधी क्र. १७(I), १७(II), ३७(I), ६७(I), ६७(II), ६७(III) व ६७(IV) मध्ये दुरुस्ती सूचविली आहे. सदर दुरुस्तीबाबतची सविस्तर माहिती सन २०१९-२०२० च्या वार्षिक अहवालात पान क्र. ८१ आणि ८२ वर नमूद केली आहे, त्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच उपविधी दुरुस्ती प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी सेंट्रल रजिस्ट्रार, दिल्ली यांचेकडे पाठविणे करीता आवश्यक त्या कागदपत्रांवर सह्या करण्याचे अधिकार अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेपैकी एकास देण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | डॉ. रत्नाकर फाटक | सभासद क्र. १०२९४ |
| अनुमोदक : | श्री. पद्मनाभ जोशी | सभासद क्र. १७२१६ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

त्यांनतर पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक यांना सांगितले.

**विषय : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, असे मा. डॉ. रत्नाकर फाटक यांनी सांगितले.

**ठराव क्र. ७** : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्यांची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | डॉ. रत्नाकर फाटक | सभासद क्र. १०२९४ |
| अनुमोदक : | सौ. पुष्पा कदम | सभासद क्र. ३६८१ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक प्रा (डॉ.) वसंत काणे यांना सांगितले.

**विषय : मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अतुल खिरवडकर यांच्या कार्यकालास मुदतवाढ देणेबाबत.**

मा. संचालक काणे सर यांनी सांगितले की, बँकेचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांचा कार्यकाल दि. ३१.०१.२०२१ रोजी संपत असून त्यांचा कार्यकाल पुढील २ वर्षाकरीता वाढविण्यास संचालक मंडळाने शिफारस केली आहे. त्याबाबतची कारणेही सभेस सांगितली. सभेत ठराव मंजुरीसाठी विनंती केली.

याबाबत पुढे बोलतांना ते म्हणाले, रिझर्व्ह बँकेने दि. ३१.१२.२०१९ रोजीच्या परिपत्रकाद्वारे Board of Management (BoM) ही संकल्पना अंमलात आणली असून त्यावर नियुक्तीसाठी पात्रतेबाबतचे निकष, त्यांची कामे इ. सूचना सदर परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. संचालक मंडळाला बँकेचा कारभार चालवितांना व विविध प्रकारची धोरणे ठरविताना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांचा सल्ला लाभला तर अधिक चांगल्या पद्धतीने बँकेचा कारभार होऊ शकेल या उद्देशाने BoM ची नेमणूक करण्यास सांगितले आहे. याच परिपत्रकामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक अथवा नेमणूकीचे नूतनीकरण यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची परवानगी आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्याबद्दलचे निकष व या संदर्भातील सविस्तर सूचना या परिपत्रकात दिल्या आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पात्रतेबाबतचे जे निकष नमूद केले आहेत, ते सर्व निकष श्री. अतुल खिरवडकर पूर्ण करीत आहेत. सभेच्या मंजुरीनंतर सदर प्रस्ताव रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीकरीता पाठविण्यात येईल.

त्यानंतर मा. प्रा. काणे यांनी कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन चालू झाल्यानंतर बँकेने ग्राहक व कर्मचारी यांच्या सुरक्षितता व फायद्यासाठी कोणकोणत्या उपाय योजना अमलात आणल्या याबाबतची माहिती सभासदांना दिली. उदा. लोकलने येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नजीकच्या शाखेत बदली करण्यात आली. ग्राहकांना बँकेच्या जास्तीतजीस्त सेवांचा लाभ घेता यावा या अनुषंगाने बँकेने विविध उपाय योजना अमलात आणल्या. बँकेने कमी व्याजदराने विविध सवलती देऊन अनेक कर्ज योजना राबविल्या.

कोणत्याही संस्थेच्या यशामध्ये त्या संस्थेतील कर्मचारी हा महत्वाचा असतो. आपल्या बँकेतील सर्व कर्मचारी व अधिकारी वर्गाने या आपत्कालीन परिस्थितीत बँकेला सर्वतोपरी साथ दिली. तसेच बँकेचे ग्राहक व सभासद ह्या सर्वांनीही चांगली साथ दिल्यामुळे आपण ह्या परिस्थितीवर मात करु शकलो. बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) चांगले असून वाढणाऱ्या ठेवी हे ग्राहकांचे बँकेवरील विश्वासाचे द्योतक आहे. याबद्दल मा. प्रा. काणे यांनी सगळयांना धन्यवाद दिले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अतुल खिरवडकर यांच्या कार्यकालास मुदतवाढ देणेबाबतचा ठराव सभेसमोर मंजुरीसाठी ठेवला.

**ठराव क्र. ८** : भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांनुसार व संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांच्या कार्यकालास दि. ३१.०१.२०२१ पासून पुढे २ वर्ष मुदतवाढ देण्यास ही सभा मंजुरी देत आहे. सदर प्रस्ताव मंजुरीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पाठविण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | प्रा. (डॉ.) वसंत काणे | सभासद क्र. १११ |
| अनुमोदक : | श्री. रमेश गोरे | सभासद क्र. ६९७५ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांना सांगितले.

**विषय : या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

मा. श्री. मधुसूदन पाटील यांनी या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणेबाबत सर्व उपस्थित सभासदांना सूचित केले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी या विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्र. ९** : या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. मधुसूदन पाटील | सभासद क्र. ३७९४४ |
| अनुमोदक : | प्रा. विलास पेणकर | सभासद क्र. ११९२ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

सभेच्या विषय परिपत्रिकेतील सर्व विषय व त्या संदर्भातील सर्व ठराव मांडून झाल्यानंतर मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी या वर्षीची सभा ऑनलाईन पद्धतीने घेण्यामागचे कारण पुन्हा एकदा सांगून सभेस उपस्थित असलेल्या सर्वांना धन्यवाद दिले व मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांना आभार प्रदर्शन करण्याची विनंती केली.

मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांनी सभेस उपस्थित सर्व सभासद व आजी माजी संचालक यांचे आभार मानले. तसेच ही सभा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्याने, त्यासाठी तांत्रिक सेवा देणाऱ्या मे. टॅनम कन्सल्टींग एल एल पी यांचे आभार मानले. त्यानंतर ही सभा यशस्वी करण्यासाठी काम केलेले बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी, कर्मचारी यांना देखील धन्यवाद दिले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार दि. २२.१०.२०२० पर्यंतच्या कार्यक्रमाची माहिती दिली. त्यानुसार, दि. १८.१०.२०२० रोजी दुपारी २.०० वाजल्यापासून ते दि. १९.१०.२०२० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सभासदांना प्रश्न नोंदणी करिताची लिंक उपलब्ध करुन देण्यात आली. लिंकवर एकूण ८ सभासदांनी १२ प्रश्न नोंदविले. लिंकवर आलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दि. २०.१०.२०२० रोजी त्याच लिंकवर देण्यात आली. त्यानंतर दि. २१.१०.२०२० रोजी सकाळी ७.०० वाजल्यापासून ते दि. २२.१०.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सभेत मांडण्यात आलेल्या ठरावांवर मतदान करणेकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यात आली.

ठरावांवर पुढील प्रमाणे मतदान झाले.

| ठराव क्र. | विषय | एकूण मतदान | बाजुने मतदान | विरुद्ध मतदान |
|---|---|---|---|---|
| १ | श्रद्धांजलीचा ठराव | ---- | --- | --- |
| २ | २०१९-२०२० आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे. तसेच सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे. | ९६९ | ९६३ | ६ |
| ३ | दि. ३१.०३.२०२० रोजीचा तपासलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे. | ९६४ | ९५८ | ६ |
| ४ | संचालक मंडळाने सुचवीलेल्या सन २०१९-२० सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे. | ९७१ | ९५१ | २० |
| ५ | सन २०२०-२१ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे. | ९६४ | ९४९ | १५ |
| ६ | उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे. | ९६० | ९४८ | १२ |
| ७ | संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे. | ९५८ | ९२६ | ३२ |
| ८ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यकालास मुदत वाढ देणे. | ९६६ | ९२६ | ४० |
| ९ | या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे. | ९५९ | ९३१ | २८ |

मत मोजणीनंतर सर्व ठराव बहुमताने मंजूर झाल्याचे त्याच लिंकवर कळविण्यात आले. अशा पद्धतीने पाच दिवसांचे सभेचे कामकाज पूर्ण झाले.